


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on




E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १२ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## निवडणूक आयोगाने आधीच निकाल ठरवला होता, मग तर्कशास्त्र फिरवले

### सिब्बल यांचा जोरदार युक्तिवाद, उद्या पुन्हा सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ नवी दिल्ली -** बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर १३ वर्ष निवडणूक आयोगाला शिवसेना राजकीय पक्षाची दुसरी घटना अस्तित्वात आहे की नाही हे कधीच समजले नाही का?, भारतीय निवडणूक आयोग सर्व राजकीय पक्षांची स्थापना आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीवर देखरेख ठेवते मग पक्षाची घटना आयोगाच्या रेकॉर्डवर नाही असा युक्तिवाद कसा करू शकतात? ही हुकूमशाही रचना आहे. पक्ष आणि चिन्हाबाबत निष्कर्ष काढण्यासारखे कोणतेही ठोस साहित्य आयोगासमोर नव्हतेच असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सुप्रीम कोर्टात मांडला.

निवडणूक आयोगाने समाजवादी पक्षाच्या खटल्यातील निकालाचा आधार घेतला. अखिलेश यादव यांनी बोलावलेले अधिवेशन घटनाबाह्य होते असं मुलायम सिंह यांच्या गटाचे म्हणणे होते. हा खटला पक्षातील फुटीशी होता असं सिब्बल यांनी कोर्टाला म्हटलं. त्यावर सरन्यायाधीशांनी त्यात कोण जिंकले, वडील की मुलगा असा प्रश्न केला. त्यावर मुलाचा विजय झाला, मी मुलाच्या बाजूने होतो असं सिब्बल यांनी सरन्यायाधीशांना सांगितले. तेव्हा कुटुंबही विभागले गेले, पक्ष खाजगी मालमत्ता बनला, पण निधनापूर्वी त्यांच्यात समझोता झाला होता ना..? त्यावर सिब्बल यांनी हो उत्तर दिले. तर पक्षातील फुटीबाबत निर्णय १० व्या अनुसूचीनुसार घ्यावा लागेल. त्यानंतरच्या घडामोडींचा विचार



केला जाऊ शकतो का यावर तुम्हाला युक्तिवाद करावा लागेल. विधिमंडळ पक्षातील फूट मूळ पक्षात किंवा मुख्य संघटनेतही पसरू शकत नाही असं घटनापीठाने म्हटलेले नाही असं न्यायमूर्ती बागची यांनी सुनावणीवेळी म्हटलं.

तसेच काल मी 'लोकप्रतिनिधी कायदा' यातले कलम २९-ए चा उल्लेख केला होता. यात उप कलम (९) आणि उप कलम (४) नुसार पक्षाचे नाव, मुख्यालय, पदाधिकारी किंवा पत्ता यामध्ये काही बदल झाल्यास त्याची माहिती निवडणूक आयोगाला देणे आवश्यक असते. आम्ही नेमके तेच केले. आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहून पदाधिकाऱ्यांची नावे कळवली होती. मात्र आता यावरून अनावश्यक वाद निर्माण केला जात आहे. आयोगाला पाठवलेल्या पत्रव्यवहारात शिवसेना पक्षप्रमुख असाच उल्लेख करण्यात आला होता. कायद्यानुसार जी माहिती देणे अपेक्षित असते ती आम्ही दिली. परंतु २०१८ च्या सुधारित पक्ष घटनेची माहिती नाही असं निवडणूक आयोग सोयीने म्हणत आहे. उपनेत्यांची नामांकन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली होती असं निवडणूक आयोग म्हणते, परंतु प्रत्यक्षात ती निवड इलेक्शनने झाली होती. आयोगाने कोर्टात सादर केलेली कागदपत्रे योग्य प्रकारे तपासली नाहीत असा आरोप कपिल सिब्बल यांनी सुप्रीम कोर्टात केला.

## चर्चेकरता अमित शाहांकडून २४ तासांची मुदत

### राहुल गांधी म्हणतात, आम्हाला पर्वा नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२नवी दिल्ली**

संसदेतील प्रलंबित कोंडी संपवण्याच्या प्रयत्नात, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी विरोधी पक्षांना चर्चेसाठी २४ तासांची मुदत दिली. ते म्हणाले की, ते त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार असून, बुधवारी दुपारी ३ वाजल्यापासून गुरुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत सभागृहात उपस्थित राहतील. मात्र, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांना काय म्हणायचे आहे याची आम्हाला पर्वा नाही, असं म्हणत ही ऑफर फेटाळून लावली आहे.

अमित शाह सभागृहात काय बोलणार आहेत, त्यांच्या लेक्चरमध्ये आम्हाला रस नाही. विद्यार्थ्यांवर कोणी गोळीबार केला? गोळीबाराचे कोणी आदेश दिले? कोणी विद्यार्थ्यांच्या




डोळ्यांवर आणि कानांवर गोळीबार केला. विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्याचे आदेश कोणी दिले होते? गृहमंत्र्यांकडून आदेश आले होते का. दिल्ली पोलिस हे गृहमंत्र्यांचं सिस्टम आहे. अमित शाहांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्याचे आदेश दिले होते का. जर त्यांनी आदेश दिले असतील तर त्यांनी राजीनामा द्यावा, असं राहुल गांधी म्हणाले.

अमित शाह निवेदन सादर करायला सभागृहात कधी येणार आहेत, हा प्रश्न नाहीय. त्यांना काय म्हणायचं आहे याच्याशी आम्हाला काही देणं-घेणं नाही. या २० दिवसांत ते गायब होते. ते इथेच (संसदेत) बसले होते. गाडी येत होती, जात होती. ३० गाड्या त्यांच्याभोवती असायच्या, त्यांच्या घराभोवती हजारो पोलीस होते. फुग्यातून हवा निघून गेली. शेवटच्या क्षणी ते हवा भरण्याचा प्रयत्न करत आहेत. पण फुगा फुटला आहे. अमित शाहांमध्ये हिंमत नाहीय. ते संसदेत येत नाहीयत, असं राहुल गांधी म्हणाले.

विरोधकांनी आज दुपारी दोन वाजेपर्यंत अध्यक्षांना पत्र द्यावे आज तीनपासून उद्या तीनपर्यंत चर्चा करावी, मी सभागृहातच आहे. सगळ्यांना ऐकून घेईन, आणि सगळ्या गोष्टींची उत्तरं देईन, सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही. मोदी सरकार सर्व प्रकारची चर्चा करण्यासाठी तयार आहे, फक्त कामकाज चालू द्यावे, असे आवाहन गृहमंत्री शाहांनी केले. विरोधकांनी दोन वाजेपर्यंत अध्यक्षांना पत्र द्यावे चर्चा करावी आणि उद्या तीन वाजता मी उत्तर देईन, असे शाह म्हणाले. मला कोणीतरी या विषयावर वक्तव्य करण्यासाठी सांगतं पण एवढ्या गंभीर विषयावर अशा प्रकारे चर्चा होऊ शकत नाही, असेही शाह म्हणाले.

## विद्यार्थ्यांना दिलासा! भरती परीक्षा प्रक्रियेत सुधारणा होणार

### फडणवीस सरकारने घेतला मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२मुंबई** भरती परिक्षा पद्धती सुधारणांसाठी फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. भरती परिक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे. महसूल स्तरावर विद्यार्थी संवाद होणार आहे. फडणवीस सरकार पेपरफूट, परीक्षा गैरप्रकारासंदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार आहे. २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारण्यात येणार आहेत. आज विशेष आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणार्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. वर्षा निवासस्थानी आज विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची




आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणार्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## बॉम्बे हायकोर्टाचा अकबरुद्दीन ओवेसींना मोठा धक्का

### प्रभू श्रीराम आणि माता कौसल्याबाबतच्या आक्षेपार्ह भाषणाचा खटला रद्द करण्यास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२छत्रपती संभाजीनगर-** ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन चे नेते आणि आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा झटका बसला आहे. २०११ मध्ये नांदेड येथे झालेल्या एका जाहीर सभेत प्रभू श्रीराम आणि माता कौसल्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल झालेला फौजदारी खटला रद्द करण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकल पीठाने ६ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

तेलंगणाचे आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांनी ८ डिसेंबर २०११ रोजी महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे एका निवडणूक रॅलीला संबोधित केले होते. या भाषणादरम्यान त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या रामजन्मभूमी निकालाचा संदर्भ देत काही वादग्रस्त विधाने केली होती. या भाषणाचा व्हिडिओ



यूट्यूबवर पाहिल्यानंतर हैदराबादचे आमदार राजासिंह ठाकूर यांनी ओवैसी यांच्याविरोधात खासगी तक्रार दाखल केली.

हैदराबाद न्यायालयाने या प्रकरणी कलम १५६(३) अंतर्गत चौकशीचे आदेश दिले, ज्यानंतर हा गुन्हा तपासासाठी नांदेडच्या अर्धापूर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. पोलिसांनी तपास पूर्ण करून १५ मार्च २०२१ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आणि १५ नोव्हेंबर २०२१ रोजी स्थानिक न्यायदंडाधिकाऱ्यांनी (गचत्रऊ) ओवैसी यांच्याविरुद्ध समन्स जारी केले होते.

अकबरुद्दीन ओवेसी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (उीझउ) कलम ४८२ अंतर्गत उच्च न्यायालयात याचिका दाखल करून हा खटला रद्द करण्याची मागणी केली होती. त्यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, हे भाषण २०११ मधील आहे आणि न्यायालयाने २०२१ मध्ये समन्स जारी केले. कायद्यानुसार ३ वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या गुन्ह्यांची दखल ३ वर्षांच्या आत घेणे बंधनकारक असल्याने हा खटला कालबाधित ठरतो.

तथापि, न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा हवाला देत हा युक्तिवाद फेटाळून लावला. कालमर्यादेची गणना ही गुन्हा दाखल झाल्याच्या किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू झाल्याच्या तारखेपासून केली जाते, न्यायालयाने समन्स जारी केलेल्या तारखेवरून नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे हा खटला कायदेशीररित्या वैध ठरवला गेला.

## राज ठाकरे सकाळीच थेट 'वर्षा' वर

### मुख्यमंत्री फडणवीसांसोबत महत्त्वाची बैठक, राजकीय चर्चांना पुन्हा उधाण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ मुंबई** गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी भाजप आणि महायुतीवर सातत्याने टीका करणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सकाळी ८.२० वाजण्याच्या सुमारास राज ठाकरे यांचा ताफा मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर पोहोचला. भाजपवर आक्रमक भूमिका घेत असतानाच राज ठाकरेंनी घेतलेल्या या भेटीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.एकीकडे ही भेट मुंबईतील प्रश्नांवर असली तरी, सद्यस्थितीतील राजकीय घडामोडींमुळे या भेटीकडे विशेष लक्ष वेधले गेले आहे. ठाकरे बंधूंची युती: नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेची युती केली होती. या नव्या समीकरणामुळे राज्याच्या राजकारणात मोठे बदल पाहायला मिळाले.राज ठाकरे यांच्यासोबत या भेटीत मुंबई क्रिकेट असोसिएशनचेअध्यक्ष अजिंक्य नाईक हेदेखील उपस्थित होते. मिळालेल्या माहितीनुसार, ही कोणतीही अचानक झालेली राजकीय भेट नसून दोन दिवसांपूर्वीच ठरलेली पूर्वनियोजित भेट होती.

## आश्रमशाळांच्या सुरक्षेसाठी उपाययोजनांवर पुन्हा खल


### 'ग्राऊंड रिपोर्ट' सादर करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत तीन निष्पाप विद्यार्थिनींचा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या संवेदनशील मुद्द्याची गंभीर दखल घेत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तातडीची बैठक घेतली. आश्रमशाळांच्या सुरक्षेचा आणि मूलभूत सुविधांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी त्यांनी नागपूर, नाशिक, ठाणे आणि अमरावती

> आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी मंगळवारी व्हीसीद्वारे आश्रमशाळा, निवासी शाळा, वसतिगृहांची सुरक्षेच्या अनुषंगाने तपासणी करण्याचे निर्देश दिले आहे. २० ऑगस्टपर्यंत हा ग्राऊंड रिपोर्ट सादर करावा लागणार असून पीओ, विस्तार अधिकारी हे शाळांना भेटी देणार आहेत.
>
> **- संदीप गोलाईत,** अपर आयुक्त 'ट्रायबल' अमरावती.



येथील अपर आयुक्तांना २० ऑगस्टपर्यंत वस्तुनिष्ठ 'ग्राऊंड रिपोर्ट' सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मंत्राच्या आदेशानंतर आदिवासी विकास विभागात कमालीची गतिशीलता आली असून एटीसी आणि पीओ स्तरावर सुरक्षेच्या अनुषंगाने वेगवान तपासणी सुरू झाली आहे. प्रत्येक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्याला आपापल्या क्षेत्रातील शाळांना प्रत्यक्ष भेटी द्याव्या लागणार आहेत. विस्तार अधिकारी आणि विशेष चमुमार्फत सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुरक्षा व्यवस्था, शैक्षणिक दर्जा आणि मूलभूत सोईसुविधांचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा घेतला जाईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधांचा वास्तववादी अहवाल शासनाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## संपादकीय ......

# महाराष्ट्रात मरण स्वस्त का झालं?

*जागतिक आदिवासी दिन साजरा करून झोपी गेलेल्या सहा विद्यार्थिनींना मण्यार या अतिशय विषारी सापाने दंश केला. यात तीन शाळकरी विद्यार्थिनींचा मृत्यू झाला तर तिघींची प्रकृती अतिशय गंभीर आहे. काळीज पिळवटून टाकणारी ही घटना महाराष्ट्रातील आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणार्या गडचिरोलीतील जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेत घडली. इतर तीन मुलींची मृत्यूसोबत झुंज सुरू आहे. यातील एका मुलीची प्रकृती खालवल्यामुळे तिला विमानाने आणण्यात आले. तिच्यावर नागपूरमध्ये उपचार सुरू आहेत. अवघ्या ११-१२ वर्षांच्या या मुलींवर काळाने घाला घातला की सरकार आणि प्रशासकीय यंत्रणेच्या अनास्थेने? महाराष्ट्रात मरण एवढं स्वस्त का होत चाललं, हा खरा प्रश्न आहे. मुंबईसारख्या महानगरांमध्ये थोडा जोरदार पाऊस काय होतो, इमारत कोसळून अख्ख कुटुंबच्या कुटुंब जमिनीखाली गाडलं जातं. रस्त्यांवरून चालताना मॅनहोलमध्ये पडून मृत्यू येऊ शकतो किंवा आनंदात शाळा संपवून स्कूलव्हॅनमध्ये बसलेल्या शाळकरी मुलांवर झाड काळ म्हणून कोसळू शकतं, घराबाहेर खेळताना भटक्या कुत्र्यांचा हल्ला होऊ शकतो. देशाचं भविष्य म्हटल्या जाणार्या मुलांचं वर्तमान असं भय आणि मृत्यूच्या छायेत का जगत आहे?*

*आदिवासी हा येथील जल-जंगल-जमिनीचा मूळ मालक. १९व्या शतकात ब्रिटिश राजवटीत भारतात आलेले प्रवासी आणि लेखकांनी इथल्या संस्कृतीचे वर्णन करताना साप, सपेरे यांचा देश म्हणून भारताचं मागासलेपण जागतिक पातळीवर अधोरेखित केलं. यामुळे पाश्चात्य लोक भारताकडे कुतूहलाने पाहत होते. मात्र स्वातंत्र्यानंतर १९७० च्या दशकापर्यंत भारताने ही ओळख पुसली. ७० च्या दशकानंतर भारत एक आधुनिक, तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करणारा देश म्हणून जागतिक पातळीवर उदयाला आला. मात्र या विकासात येथील आदिवासी अजूनही गावकूसाबाहेरच का आहे, हा सवाल या तीन मुलींच्या दुर्दैवी मृत्यूने ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्राच्या पूर्व टोकास असलेला गडचिरोली जिल्हा. गोंडवाना प्रदेशातील गडचिरोलीत माडिया गोंड ही आदिम जमात प्रामुख्याने राहाते.*

*अमरावतीतील मेळघाटात कोरकू आदिवासी तर यवतमाळमध्ये कोलाम ही आदिवासी जमात. या जिल्ह्यांमध्ये विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. येथील जंगल आणि लोहखनिज व्यापारी, उद्योजकांना हवं आहे. विकासासाठी महाराष्ट्र सरकारकडून औद्योगिकीकरण आणि खनिकर्माला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जात आहे. पण या विकासात येथील मूळ आदिवासींचे विस्थापन होत आहे, त्यांच्या अस्तित्त्वाचा आणि अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विकासात आपण मागे राहिलो, पण आपली पोरंबाळं मागे राहायला नको, म्हणून आदिवासी समाज आपल्या काळजाच्या तुकड्याला आदिवासी आश्रमशाळेत शिकायला पाठवतात. सरकारकडून हमी दिली जाते की आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सकस नाश्ता, दोन वेळचं पौष्टिक भोजन दिलं जाईल. दूरवरच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या आवारात सुरक्षित व सुसज्ज निवासी व्यवस्था अर्थात हॉस्टेल असेल. तिथे त्यांना झोपण्यासाठी खाटा, गादी, तसेच ब्लँकेट पांघरूण, चादर आणि उशा यांसारखे साहित्य दिले जाईल. शालेय साहित्य, गणवेश, थंडीसाठी उबदार स्वेटर, बूट, सॉक्स मोफत दिले जाईल. मात्र प्रत्यक्ष स्थिती काय आहे हे धानोरा तालुक्यातील जपतलाई आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूने दाखवून दिले.*

*विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा अजून वेगळा विषय. या शाळांमध्ये शिक्षक वेळेवर हजर राहातात का, मुख्यालयाच्या ठिकाणी मुक्कामी असतात का, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते का, हे आणखी विषय आहेत. यासाठी आदिवासी विभागाच्या आयुक्तांपासून शाळेचे मुख्याध्यापक आणि खासगी अनुदानित शाळांच्या संस्थाचालकांपर्यंत एक सर्वांचीच एकदा झाडाझडती घेण्याची गरज आहे. आजही कित्येक गावांमध्ये आदिवासींची पहिली पिढी शिक्षण घेत आहे. त्यांना त्यांचे हक्क आणि अधिकारही माहीत नाहीत, अशा परिस्थितीत सरकार आपल्या पोरांना मोफत शिक्षण देत आहे हीच त्यांच्यासाठी मोठी उपकाराची बाब ठरते. अधिकारांची जाणीव नसल्यामुळे तिथे मिळणार्या असुविधांबद्दल ते ब्र देखील काढत नाहीत. जपतलाई आश्रमशाळेतील घटनेनंतर आता सरकारकडून कारवाईचा शासकीय सोपस्कार पार पडेल. मात्र गेलेल्या जीवांचे काय? राज्यात शासकीय आणि अनुदानित अशा एक हजारापर्यंत आश्रमशाळा आहेत. या सर्वच आश्रमशाळांची अवस्था जपतलाईपेक्षा वेगळी नाही.*

*विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके नाहीत, नाष्ता आणि भोजनाच्या नावाने फक्त पाणीदार डाळ आणि अर्ध्याकच्च्या भाजलेल्या पोळ्या आणि तसाच भात या विद्यार्थ्यांच्या वाट्याला येतो. ही अनेक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची तक्रार आहे. विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी खाटा तर कुठेच नसतात. घरूनच आणलेली वाकळ, गोधडी, सतरंजी, चादर त्यांचे अंथरुण-पांघरुण असते. मग शासकीय कागदपत्रांवरील सोयी-सुविधांचा मलिदा कोण खातं? याचा शोध यानिमित्ताने गडचिरोलीचे पालकमंत्री असलेल्या मुख्यमंत्र्यांनी स्वत: घेतला पाहिजे. एक बरं झालं, पहिली कारवाई तपासणी करणार्या अधिकार्यावर झाली. आदिवासी विकास विभागात सर्वाधिक 'विकास' हा या तपासणी अधिकार्यांचाच झाला असल्याचा आरोप होत आहे. कागदी घोडे नाचवून आदिवासींच्या नावाने विकासाची गंगा स्वत:च्याच घरात-बंगल्यात वळवली गेल्याचे उघड सत्य आहे. स्वातंत्र्यानंतर ७० च्या दशकापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी जशी साप-सपेर्यांचा देश ही ओळख पुसली तशीच आता आदिवासींची आणि सरकारी पैशांची होणारी लूट थांबवण्याची गरज आहे. आदिवासींना त्यांचे हक्क, अधिकार, कायदे यांची ओळख सरकारनेच करून दिली पाहिजे. त्यांच्या हिश्श्याचं त्यांनाच मिळेल अशी पारदर्शक यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे. कारण मरण एवढं स्वस्त होणं, हे कोणत्याही राज्याच्या निरोगी आरोग्याचं लक्षण असू शकत नाही.*

# चिखलदऱ्यात कोट्यवधींचं सुसज्ज बसस्थानक कुलूपबंद

## अमरावतीहून थेट नियमित बससेवा नसल्यामुळं पर्यटक संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ चिखलदरा-** विदर्भाचा नंदनवन, थंड हवेचं ठिकाण आणि लाखो पर्यटकांचं आकर्षण असलेल्या चिखलदऱ्याला जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अमरावती शहरातून थेट एसटी बससेवा नसल्याची विसंगत परिस्थिती आहे. अमरावती जिल्ह्यातील अकरा तालुक्यांपैकी चिखलदरा वगळता इतर तालुक्यांशी अमरावतीची एसटी सेवा उपलब्ध आहे. परंतु, चिखलदरासाठी अमरावती मध्यवर्ती आगारातून नियमित बस फेरी नाही. विशेष म्हणजे चिखलदऱ्यात प्रवाशांसाठी सुसज्ज बस स्थानक उभारण्यात आलंय. तरीही या बस स्थानकातून अमरावतीकडं जाणाऱ्या बसचा अभाव असल्यामुळं प्रवाशांसह पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



सुसज्ज बसस्थानक, पण इमारतीच्या दाराला कुलूप :चिखलदरा इथं राज्य परिवहन महामंडळांना अत्यंत सुसज्ज बस स्थानकाची इमारत उभारली आहे. कार्यालय, चौकशी कक्ष, चालक वाहक विश्रांतीगृह, हिरकणी कक्ष यासारख्या सुविधा इथं उपलब्ध केल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात या सुविधांचा वापर कितपत होतो? हा प्रश्नच आहे. बस स्थानकाचा कारभार परतवाडा आगारातून चालत असल्यामुळं चिखलदऱ्यात उभारलेल्या या इमारती अनेक सुविधा कुलूप बंद अवस्थेत आहेत. एकीकडं लाखो रुपये खर्च करून उभारलेली पायाभूत सुविधा आणि दुसरीकडं तिचा पुरेसा वापर नसल्याचं चित्र दिसत आहे. त्यामुळं एसटी महामंडळाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

चिखलदरा बस स्थानकावर आवडेल तिथं प्रवास योजनेसह विविध पाच योजना आणि प्रवासी सवलतींचे फलक लावले आहेत. महाराष्ट्र तसंच आंतरराज्य प्रवासासाठी सात दिवसांच्या पाचपासून मासिक पास आणि त्रैमासिक पासपर्यंतच्या योजनांची माहिती या फलकावर दिली आहे. प्रौढ आणि लहान मुलांसाठी साध्या तसंच शिवशाही बसच्या पासचे दर विविध कालावधीच्या पाच योजना यांची माहिती प्रवाशांसाठी दिली आहे. मात्र, या सर्व योजनांची माहिती देणाऱ्या बस स्थानकातून जिल्ह्याचे प्रमुख केंद्र असलेल्या अमरावतीसाठी नियमित बस सेवा नसणं ही या व्यवस्थेतील सर्वात मोठी विसंगती ठरत आहे.एसटी महामंडळाच्या वतीनं विविध सामाजिक घटकांना देण्यात येणाऱ्या प्रवासी भाड्यातील सवलतीचा मोठा तक्ताही बस स्थानकावर लावला आहे. या तक्त्यात तब्बल ४३ प्रकारच्या सवलतींचा उल्लेख आहे. त्यापैकी १८ सवलती १०० टक्के असल्याचं नमूद आहे. इतर सवलती ७०, ५०, ४५ आणि ३० टक्के अशा विविध प्रमाणात असल्याचं फलकावर दर्शवलं आहे. प्रवाशांच्या हितासाठी सवलतीची एवढी मोठी व्यवस्था दाखवली जात आहे. यावेळी प्रवाशांना त्यांच्या गरजेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी पुरेशी बस सेवा मात्र उपलब्ध नसल्यामुळं या फलकांचं औचित्य काय? असा अहवाल उपस्थित होत आहे.

### परतवाडा, धारणी आणि यवतमाळचीच जोडणी

चिखलदरा बस स्थानकावरून परतवाडा, धारणी आणि अमरावती वरून चिखलदरा या दिशांना बस सेवा उपलब्ध आहे. यवतमाळसाठी सकाळी सहा वाजता बस सुटते. तर धारणीसाठी सकाळी ११ वाजता बस जाते. यवतमाळहून रात्री साडेआठच्या सुमारास चिखलदराला येणारी बस इथं मुक्कामी असल्याचं सांगण्यात येतं. मात्र, या बसची वेळ योग्य नाही. परतवाडा आणि धारणी मार्गानं येणाऱ्या काही गाड्यांचाही चिखलदऱ्यात मुक्काम असल्याचं बस स्थानकावरील माहितीत नमूद आहे. मात्र प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या फेऱ्यांची संख्या यापेक्षा कमी असल्याचं प्रवाशांचं म्हणणं आहे.

# ई-पीक पाहणीतील तांत्रिक अडचणी दूर करा

## सरपंच परिषद तिवसा तालुका तर्फे तहसीलदारांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ तिवसा**
शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली डिजिटल क्रॉप सर्व्हे (ऊडस) अर्थात नवीन ई-पीक पाहणी प्रणाली तिवसा तालुक्यात सुरळीतपणे सुरू व्हावी, तसेच पीक पेरा नोंदणी वेळेत आणि अचूक पद्धतीने पूर्ण व्हावी, यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सरपंच परिषद तिवसा तालुका च्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात आज तिवसा तहसील कार्यालयात तहसीलदारांमार्फत राज्याच्या महसूल मंत्र्यांना निवेदन देण्यात आले.



ई-पीक पाहणीच्या नवीन प्रणालीमध्ये विविध तांत्रिक अडचणी येत असून, सहाय्यकांची अपुरी संख्या आणि ग्रामीण भागातील नेटवर्कच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना पीक नोंदणी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तिवसा तालुक्यातील ई-पीक पाहणीची नोंद वेळेत आणि अचूक पद्धतीने पूर्ण होण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.ई-पीक पाहणीचे काम अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक ५०० ते ६०० प्लॉटमागे किमान एका सहाय्यकाची नियुक्ती करण्यात यावी. सध्या उपलब्ध असलेल्या सहाय्यकांच्या संख्येमुळे मोठ्या प्रमाणावर पीक नोंदी वेळेत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




देशाचे यशस्वी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित भाई शाह यांची आज राणा दाम्पत्यांनी नवी दिल्ली येथे भेट घेतली.

## डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात

# अवयवदान जनजागृती मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-**
स्थानिक डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे शासनाच्या व अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्राचे सूचनेनुसार ग्रीन लाईट कॅम्पेन विक अंतर्गत, अवयदाना बाबत जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमाला, पोलीस विभागातील कर्मचारी, परिवहन विभागातील अधिकारी , कर्मचारी तसेच महाविद्यालयीन व रुग्णालयात कार्यरत तांत्रिक कर्मचारी, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुग्णालयाचे



वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. तर नेपोलॉजीष्ट डॉ निखिल बडनेरकर यांनी अवयदानाचे महत्त्व, आकडेवारी सहित पीपीटी द्वारे सादर केले. तर नेपोलॉजीष्ट डॉ स्वप्नील मोलके यांनी पीपीटी द्वारे ब्रेन स्टेम डेथ प्रक्रिया बाबत सादरीकरण केले. नेत्र तज्ञ डॉ. रेणू पाटील यांनी नेत्रदान व नेत्रपत्यारोपना बाबत पीपीटीच्या माध्यमातून प्रस्तुतीकरण केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रुग्णालयात झालेल्या दहा किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेच्या किडनी दात्यांचा सत्कार प्रमाणपत्र व पुष्प देऊन अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ.अनिल देशमुख यांनी ब्रेन स्टेम डेथ रुग्णाच्या नातेवाईकांचे समुपदेशन करून अवयवदान करण्यास प्रवृत्त करावे, असे आव्हान उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन ट्रान्सप्लांन्ट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने मेडिसिन विभाग प्रमुख, डॉ.शुभांगी वर्मा, नेत्र विभाग प्रमुख डॉ.स्मिता कडू, बधीरीकरण विभाग प्रमुख डॉ.विजया पाटील, अँनाटामी विभाग प्रमुख, डॉ. दिपाली विधळे, फिजीओलॉजी विभाग प्रमुख, डॉ एस एस पांडे, डॉ अजय डफळे, नेपरोलॉजिस्ट डॉ प्रणित काकडे , सिस्टर इन्जार्ज, नर्सिंग स्टाफ व इतर सर्व महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होते. शेवटी अवयदानाबद्दल उपस्थिततांनी शपथ घेतली. कार्यक्रम यशस्वीते करिता रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे,डिन स्वियं सहाय्यक किशोर इंगळे, आरती मोरांडे, अमोल जवंजाळ, रोशन थोरात आदींनी परिश्रम घेतले.

## संत गाडगेबाबा समाधी स्थळासाठी

# २५ कोटींचा विकास आराखडा मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
अमरावती येथील गाडगेनगरस्थित संत गाडगेबाबा समाधीस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने तब्बल २५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २० जुलै रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आमदार सुलभाताई खोडके यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.या निधीतून संत गाडगेबाबा समाधीचा जीर्णोद्धार, कुंताबाई समाधीचे सुशोभीकरण, संत गाडगे महाराज स्मृती केंद्राचे उर्वरित बांधकाम, शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटरच्या तळमजल्याचे बांधकाम, यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यात येणार आहे. तसेच अद्ययावत कीर्तन सभागृह, ध्यान केंद्र,



अंतर्गत रस्ते, वाहनतळ आणि आकर्षक उद्यान उभारले जाणार आहे.समाधीस्थळाचा विकास तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळाच्या धर्तीवर करण्यासाठी आमदार सुलभाताई खोडके यांनी सातत्याने पाठपुरावा केला. २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात २५ कोटींच्या निधीची घोषणा करण्यात आली होती.या विकासामुळे भाविकांना आधुनिक सुविधा मिळण्यासोबतच अमरावतीच्या धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार असल्याचे आमदार खोडके यांनी सांगितले. निधी मंजूर केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार यांचे आभार मानले.

# दर्यापूर-आसरा मार्गावरील ४ हजार वृक्ष लागवडीत भ्रष्टाचाराचा आरोप

## १५ ला किरण होले यांचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात उग्र आंदोलनाचा इशारा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर,**
सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत दर्यापूर ते आसरा या १३ किलोमीटर मार्गावर करण्यात आलेल्या सुमारे ४ हजार वृक्ष लागवडीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विकी उर्फ किरण होले यांनी केला आहे. निकृष्ट दर्जाची झाडे लावून शासनाच्या निधीची अफरातफर करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. याबाबत विकी उर्फ किरण होले यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे यांना लेखी निवेदन दिले असून, दर्यापूर पोलीस स्टेशनसह विविध संबंधित प्रशासनिक अधिकाऱ्यांनाही सूचना पत्र पाठविण्यात आले आहे. निवेदनात अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमत करून वृक्ष लागवडीच्या कामात अनियमितता केल्याचा आरोप करण्यात आला आहे. होले यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, १३ किलोमीटरच्या मार्गावर तब्बल ४ हजार झाडांची लागवड झाल्याचे दाखविण्यात आले; मात्र प्रत्यक्षात अनेक झाडे निकृष्ट दर्जाची असून ती वाळलेली किंवा अपुरी असल्याचे दिसून येते. जनतेच्या पैशाची लूट करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठीच आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे. मागण्या मान्य न झाल्यास येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी प्रशासनाविरोधात उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.दरम्यान, या आरोपांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काय कारवाई करते, याकडे आता संपूर्ण दर्यापूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# मेळघाटातील आश्रमशाळेत ‘मंत्रोपचार’, आश्रमशाळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## कायमस्वरूपी उपाययोजनांकडे अक्षम्य दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मेळघाट–**

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याने आश्रमशाळांतील सुरक्षाव्यवस्था ऐरणीवर आली आहे. मेळघाटातसुद्धा अशा घटना घडल्या आहेत. अस्वलाच्या हल्ल्यात दोन विद्यार्थी, एक शिक्षक व एका वनपालाचा झालेला मृत्यू, पाण्याची टाकी पडून विद्यार्थिनीचा झालेला मृत्यू, विषबाधेने आजारी पडलेले विद्यार्थी, विचित्र आजाराने त्रस्त विद्यार्थी, अशा गंभीर घटना मेळघाटातील आश्रमशाळांत घडल्या असतानाही ठोस उपाययोजना होत नसल्याची स्थिती आहे. तात्पुरती मलमपट्टी करण्यात येत असली तरी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत नसल्याने प्रश्नांची मालिका कायम आहे. मेळघाटातील डोमा येथील आश्रमशाळेत एका विद्यार्थिनीच्या प्रकृतीशी संबंधित प्रकारावर वैद्यकीय तपासणी करण्याऐवजी भूमकाकडून कथितरीत्या पूजा-मंत्रोपचार करण्यात आल्याचा प्रकार आता समोर आला आहे. या घटनेमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी आश्रमशाळेतील एका विद्यार्थिनीला अचानक त्रास जाणवू लागला. प्रकृती अस्वस्थ झाल्यानंतर तिला वैद्यकीय उपचारासाठी नेण्याऐवजी कथितरीत्या भूमकाकडे नेण्यात आले. तेथे विद्यार्थिनीवर पूजा-मंत्रोपचार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थिनीच्या प्रकृतीमागील नेमके कारण शोधण्यासाठी डॉक्टरांकडून तपासणी व आवश्यक वैद्यकीय उपचार होणे अपेक्षित असताना अशाप्रकारचा मार्ग अवलंबल्याने चिंता व्यक्त होत आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या आरोग्याची जबाबदारीही संबंधित प्रशासनाची आहे. आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आजारपण किंवा आरोग्यविषयक त्रास उद्भवल्यास तातडीने आरोग्ययंत्रणेशी संपर्क साधणे आवश्यक आहे. मात्र, या घटनेत वैज्ञानिक उपचारांऐवजी भूमकाचा आधार घेतल्याचे समोर आल्याने आश्रमशाळेतील संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, विद्यार्थिनीच्या प्रकृतीचे नेमके कारण काय होते, तिला कोणता त्रास झाला होता, तिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली का? आणि संबंधित प्रकाराबाबत शाळा प्रशासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली का?, याबाबत स्पष्टता झालेली नाही.



### विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ नको

आश्रमशाळांमध्ये ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे त्यांना वेळेवर आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक औषधोपचार करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने रुग्णालयात दाखल करणे गरजेचे आहे. डोमा आश्रमशाळेतील याप्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

### आश्रमशाळांमध्ये २२ हजारांवर विद्यार्थी
### काही अनुदानित आश्रमशाळांची परिस्थिती गंभीर

अमरावती जिल्ह्यात आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्राबाहेर एकूण ४७ आश्रमशाळांमध्ये जवळपास २२ हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिल्ह्यात काही अनुदानित व शासकीय आश्रमशाळांची स्थिती गंभीर आहे. दोन वर्षांपासून शासकीय आश्रमशाळांच्या रचनेमध्ये बदल दिसत आहेत. नव्याने बांधकाम सुरू झाल्याने बऱ्यापैकी इमारतीची परिस्थिती व येथील व्यवस्थेत बदल दिसून येतो. चिखलदरा तालुक्यात सहा, तर धारणी तालुक्यात आठ शासकीय आश्रमशाळा आहेत. उर्वरित शासकीय आश्रमशाळा या परतवाडा, अंजनगावसुर्जी, वरुड व इतर ठिकाणी आदिवासी क्षेत्राबाहेर आहेत. त्यापैकी आठ ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयांनाही जोडण्यात आले आहे. याव्यतिरिक्त मेळघाटमधील चिखलदरा व धारणी, या दोन तालुक्यांत अनुदानित आश्रमशाळांची संख्या २७ च्या घरात आहे. काही अनुदानित आश्रमशाळा या आदिवासी क्षेत्राबाहेरही आहेत. जिल्ह्यातील २० शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १२ हजार मुले-मुली प्रवेशित असून, २७ अनुदानित आश्रमशाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ११ हजार ५०० च्या घरात आहे.

# मुथूट फिनकॉर्पच्या कार्यालयाची झडती

## एका सुवर्णकारास चौकशीसाठी बोलविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

बसस्थानक मार्गावरील विमको टावरमध्ये असलेले मुथूट फिनकॉर्प लिमिटेडचे कार्यालय पोलिस संरक्षणात सुरू झाले. तपास अधिकाऱ्यांनी मंगळवारी (ता. ११) सदर कार्यालयाची झडती घेतली. आतापर्यंत पोलिसांकडे प्राप्त होत असलेल्या ग्राहकांच्या तक्रारी आणि घरून जप्त करण्यात आलेले काही दस्तऐवज यात किती तथ्य आहे, यासंदर्भात मुथूट फिनकॉर्पच्या संगणकामध्ये असलेला डेटा पोलिसांकडून तपासणीचे काम आता सुरू झाले आहे, असे पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांनी सांगितले. तपासामध्ये ज्या एका सुवर्णकाराकडे सोने तारण ठेवल्या गेले त्याला मंगळवारी पोलिसांनी कोतवाली ठाण्यात चौकशीसाठी बोलविले होते. मुथूट फिनकॉर्प कार्यालयाला भेट देतेवेळी या कोट्यवधीच्या अपहारातील मुख्य सूत्रधार व व्यवस्थापक राहिलेला शुभम रवींद्र वासेवाय, सूरज अनिल खैरकार, धीरज पंचम शिरसाट हे तिघेही चौकशीदरम्यान फिनकॉर्पच्या कार्यालयात हजर होते. शेकडो ग्राहकांना शुभम व त्यांच्या टीमने सोने तारण ठेवून कंपनीकडून लाखो रुपयांचे कर्ज दिले. परंतु त्यापैकी काही ग्राहकांचे तारण असलेले दागिने व भरलेली हप्त्याची रक्कम ही कंपनीच्या कार्यालयात किंवा रेकॉर्डवर उपलब्ध दिसत नाही. शुभमने संगणक सिस्टीममध्ये बिघाड असल्याचे सांगून कर्जाचे हप्ते भरणाऱ्या ग्राहकांना बनावट पावत्या दिल्याची बाबही पोलिसांच्या तपासात पुढे आली होती. याप्रकरणात फिनकॉर्प कंपनीच्या एका महिला कर्मचाऱ्याने अटकेच्या भीतीमुळे अंतरिम अटकपूर्व जामीन मिळविला आहे. प्राथमिक तक्रारीत ७०० ग्रॅम सोने आणि ४७ लाखांची रोकड, अशा कोट्यवधींच्या ऐवजाचा अपहार केल्याची बाब तक्रारीत नमूद करण्यात आली होती. ग्राहकांच्या तक्रारीनंतर अपहाराच्या रकमेचा आकडा वाढू शकतो. संशयित शुभमने तारण ठेवलेल्या सोन्यापैकी आतापर्यंत ९० ग्रॅम सोने दोन सुवर्णकारांकडून पोलिसांनी जप्त केले आहेत. शुभमसह त्याचे दोन्ही साथीदार, असे तिघे १३ ऑगस्टपर्यंत कोतवाली पोलिसांच्या कोठडीत आहेत.




# महाविद्यालयांमध्ये ‘फाऊंडेशन ऑफ एआय’ विषय अनिवार्य

## अमरावती विद्यापीठाचा ऐतिहासिक निर्णय, महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना भविष्यातील स्पर्धात्मक युगासाठी सज्ज करण्यासाठी अमरावती विद्यापीठाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण व दूरगामी निर्णय घेतला आहे. विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी स्तरावरील पाचव्या सत्रात ‘फाऊंडेशन ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स’ हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा क्रांतिकारी निर्णय घेणारे अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. विद्यापीठाच्या या नव्या निर्णयानुसार, पदवी अभ्यासक्रमाच्या पाचव्या सत्रातील सर्व चारही प्रमुख विद्याशाखा मानवविज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यामधील विद्यार्थ्यांना हा विषय सक्तीचा असणार आहे. या विषयाच्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात मोठी भर पडणार असून ते पदवी स्तरावर असतानाच ‘आर्टिफिशिअल इंटेलिजन्स’ सारख्या आधुनिक तंत्रज्ञानात सहज पारंगत होतील.

या विषयाची परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर घेतली जाईल. महाविद्यालयांकडून परीक्षा झाल्यानंतर या विषयाचे गुणांकन व ग्रेड्स विद्यापीठाकडे पाठविले जातील. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत या विषयाची ग्रेड समाविष्ट केली जाणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेला एक अतिरिक्त व्यावसायिक महत्त्व प्राप्त होईल. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे उच्च शिक्षणात आधुनिकतेची जोड मिळाली असून, विद्यार्थ्यांच्या करिअरला नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे. विद्यापीठाने घेतलेल्या या स्तुत्य निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत असून, सर्व संबंधित महाविद्यालयांनी या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तातडीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

तंत्रज्ञानाचे क्षेत्र दिवसेंदिवस प्रचंड वेगाने विस्तारत आहे. अशा पृष्ठभूमीवर आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे आगामी काळातील मुख्य तंत्रज्ञान असणार आहे. पदवी स्तरावरच विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानाचे धडे मिळाल्यास त्यांच्या ज्ञानात मोठी भर पडेल आणि त्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल बनेल. विद्यापीठाने घेतलेला हा विद्यार्थीभिमुख उपक्रम राज्यातील सर्व महाविद्यालयांनी अत्यंत गांभीर्याने आणि यशस्वीपणे राबवावा, जेणेकरून आपले तरुण विद्यार्थी जागतिक पातळीवर सक्षमपणे उभे राहू शकतील.

**– डॉ. मिलिंद बारहाते, कुलगुरू**


# आमझरी व खटकली परिसरात पर्यटनसंकुल उभारण्याचे आयुक्त लीना बनसोड निर्देश

## ग्रामस्थ व होम-स्टे लाभार्थ्यांशी साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती,**

चिखलदरा तालुक्यातील आमझरी व खटकली या गावात पर्यटन विकासासाठी मोठ्या संधी असून स्थानिक आदिवासी समाजाला नव्या रोजगाराच्या मार्ग उपलब्ध करून देण्याच्या हेतूने येथे पर्यटन संकुल उभरण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश आदिवासी विकास आयुक्त व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी दिले.

येथील वनविभागाच्या आमझरी संकुलात आयोजित संवाद बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.या बैठकीला प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, सह आयुक्त दिगंबर चव्हाण, उपायुक्त संतोष ठुबे, उपायुक्त विनिता सोनवणे, उपायुक्त शशिकला अहिरराव, शबरी महामंडळाचे शाखा व्यवस्थापक गणेश साखरे, वरिष्ठ सल्लागार प्रशांत ब्राह्मणकर आणि विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक नागरिक व पर्यटन समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.



स्थानिकांनी पारंपरिक व उत्स्फूर्त पद्धतीने मान्यवरांचे स्वागत केले आणि आदिवासी बांधवांनी संवाद सत्रात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.बैठकीत लीना बनसोड यांनी सांगितले की शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन योजना राबवल्या जात आहेत.आमझरी व खटकली भागातील नैसर्गिक सौंदर्याचे संवर्धन करताना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि आदिवासी खाद्यपरंपरेला जागतिक पातळीवर ओळख देण्याचे काम आदिवासी विकास विभाग करीत आहे. त्यांनी या परिसरासाठी एक सर्वसमावेशक व आकर्षक टुरिस्ट प्लॅन तयार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आणि पर्यटकांना भेट देण्यासारख्या स्थळांचे, अनुभवांचे व मार्गनिर्दशनाचा संपूर्ण आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. पर्यटकांना स्थानिक आदिवासी खाद्यसंस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव देता यावा, यासाठी पारंपरिक पदार्थांच्या रेसिपींचे अधिकृत दस्तऐवजीकरण करणे आणि त्यामुळे स्थानिक महिलांना व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा योजनेचा महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरण रक्षणसोबत परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कठोर नियमावली लागू करण्यावर भर देण्यात येत असल्याचे सांगितले. पर्यटकांनी कचरा करू नये यासाठी आचारसंहिता तयार करण्यात येईल व परिसरातील नियमित साफसफाई व्यवस्था राबवली जाईल,असे यावेळी सांगण्यात आले. त्याचबरोबर परिसरातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांची माहिती देऊन पर्यटनाला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे. आदिवासिंची पारंपरिक कला, सांस्कृतिक कार्यक्रम आणि हस्तकला यांद्वारे पर्यटनाला अधिक प्रभावी बनवण्याचे उपक्रम राबवले जातील. पर्यटनविकासात रस्ते व कनेक्टिव्हिटीचे महत्त्व लक्षात घेऊन या भागातील रस्ते विकासावर व संबंधित पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्यात येईल, असेही यावेळी सांगण्यात आले. बैठकीत उपस्थित स्थानिक नागरिक व होम-स्टे लाभार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल सकारात्मकता व्यक्त केली आणि स्थानिक पातळीवर सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. पुढील टप्प्यांबद्दल व अंमलबजावणीच्या तांत्रिक बाबींबाबत संबंधित अधिकाऱ्यांमार्फत तपशीलवार नियोजन केले जाईल, असेही बैठकीत सांगण्यात आले.–

# १०२ रुग्णवाहिका चालकांचे मानधन थकीत

## ईपीएफही रखडला, १४ ऑगस्टपासून बेमुदत कामबंदचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्यकेंद्रांवर १०२ रुग्णवाहिकेवर चालक म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे जून आणि जुलै महिन्यांचे मानधन थकीत असून भविष्यनिर्वाह निधी (ईपीएफ) भरण्यातही अनियमितता झाल्याचा आरोप चालकांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने संतप्त चालकांनी १४ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

जिल्हा परिषदेच्या निविदाप्रक्रियेतून एप्रिल २०२६ पासून रुग्णवाहिका चालकांची नियुक्ती करण्यात आली. यासाठी पुणे व अमरावती येथील कंत्राटदारांकडे चालकांची जबाबदारी देण्यात आली आहे. ई-निविदेच्या अटींनुसार कर्मचाऱ्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपूर्वी अदा करणे तसेच भविष्यनिर्वाह निधीसह अन्य शासकीय कपातींचा वेळेत भरणा करणे अपेक्षित आहे. मात्र चालकांच्या म्हणण्यानुसार पुणे येथील कंत्राटदारांनी केवळ एप्रिल महिन्याचा ईपीएफ भरला असून जून व जुलै महिन्याचे मानधन थकीत आहे. दुसरीकडे अमरावती येथील कंत्राटदाराने एप्रिल आणि मे महिन्याचा ईपीएफ भरला असून जून व जुलैचे मानधन अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे चालकांवर आर्थिक संकट ओढवले आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांसाठी रुग्णवाहिका सेवा ही अत्यावश्यक आहे, अशा परिस्थितीत चालकांचे मानधन थकीत राहिल्यास त्याचा थेट परिणाम त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहावर होण्याबरोबरच आरोग्यसेवेवरही होण्याची शक्यता आहे. मात्र चालकांच्या म्हणण्यानुसार पुणे येथील कंत्राटदारांनी केवळ एप्रिल महिन्याचा ईपीएफ भरला असून जून व जुलै महिन्याचे मानधन थकीत आहे.विशेषतः मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागात वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास रुग्णांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे १४ ऑगस्टपूर्वी थकीत मानधन व ईपीएफचा प्रश्न निकाली काढून चालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद व उपोषण करण्याचा निर्धार १०२ रुग्णवाहिका चालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, उपाध्यक्ष अनवर खान, सचिव पंकज हाडोळे, कोषाध्यक्ष समीर खान यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन देऊन व्यक्त केला आहे.



मानधन व ईपीएफच्या प्रश्नाबाबत २१ जुलै, २८ जुलै आणि ६ ऑगस्ट २०२६ रोजी संबंधित प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून समस्या मांडल्या. मात्र वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नाही. कंत्राटदारांकडे मानधनाबाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने कामबंद आंदोलन करण्यात येत आहे.

**प्रदीप पवार**, जिल्हाध्यक्ष, १०२ वाहनचालक संघटना.

# उद्या पासून सुरु होणाऱ्या श्रावण महिन्यात राहणार सणांची पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

चातुर्मासाला २५ जुलैपासून सुरवात झाली असली, तरी धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवांच्या पर्वणीला आता श्रावण महिन्यापासून सुरवात होणार आहे.

उद्या गुरुवारपासून श्रावणमासारंभ होत असून, त्यानंतर नागपंचमी, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळी आदी सणांची मालिकाच सुरू होणार आहे. श्रावणापासून कार्तिकी एकादशीपर्यंत तब्बल चार महिने भक्ती, उत्साह आणि मांगल्याचे वातावरण राहणार आहे. त्यामुळे घराघरांत चैतन्याचे वातावरण, तर बाजारपेठांमध्ये खरेदीचा उत्साह दिसून येणार आहे. सणांच्या या मालिकेची सांगता २१ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशीने होणार असल्याने श्रावणापासून कार्तिकी एकादशीपर्यंतचा काळ धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. श्रावण महिन्याला भारतीय संस्कृतीत विशेष धार्मिक महत्त्व आहे. या महिन्यात विविध व्रत-वैकल्ये, पूजाअर्चा आणि धार्मिक उपक्रमांना सुरवात होते. श्रावणी सोमवारी भगवान शंकराची उपासना, तर मंगळवारी मंगळागौरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित केले जाणार आहेत.



सत्यनारायण पूजेसह विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे घरोघरी आनंदाचे वातावरण राहणार आहे. १७ ऑगस्ट रोजी नागपंचमी, २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन, तर ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी होणार आहे. त्यामुळे श्रावण महिन्यातील धार्मिक वातावरण अधिकच बहरणार आहे.

### नोव्हेंबरमध्ये दिवाळीचा प्रकाशोत्सव

नवरात्रोत्सव आणि दसऱ्यानंतर अवघ्या काही दिवसांत दिवाळीचा प्रकाशोत्सव सुरू होणार आहे. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दिवाळी साजरी होणार असून, आठ नोव्हेंबर रोजी नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन एकाच दिवशी येणार आहे. दिवाळीच्या विविध दिवसांमुळे घराघरांत उत्साहाचे वातावरण राहणार असून, बाजारपेठांमध्येही खरेदीची लगबग वाढणार आहे.

### गणेशोत्सवाने, नवरात्रोत्सवाने वाढणार उत्साह

श्रावणानंतरच्या सणांच्या मालिकेत सर्वाधिक उत्सुकता असलेल्या गणेशोत्सवाला १४ सप्टेंबर रोजी श्रीगणेश चतुर्थीपासून सुरवात होणार आहे. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेने शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ होईल. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीच्या उपासनेसह विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. २० ऑक्टोबर रोजी दसरा साजरा होणार आहे.

### अधिकमासामुळे सणांचे वेळापत्रक पुढे

श्रावण महिन्यापासून सुरू होणाऱ्या व्रत-वैकल्यांना आणि सणांना भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. यंदा अधिकमास आल्यामुळे श्रावण, भाद्रपद व आश्विन महिन्यातील सण-उत्सव गेल्या वर्षीच्या तुलनेत साधारण १८ ते २० दिवसांनी उशिरा येणार आहेत. त्यामुळे सणांच्या तारखांमध्ये बदल झाला असून, यंदाचे सण-उत्सवांचे वेळापत्रक पुढे सरकले आहे.

# पोलीस आयुक्त राकेश ओला रस्त्यावर... शहरातील वाहतुकीचा घेतला आढावा..






*गेल्या अनेक महिन्यांपासून अमरावती शहरातील बेशिस्त वाहतुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.. याचं निमित्ताने अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अचानक अमरावती शहरातील इर्विन चौकात सरप्राईज व्हिजिट करून वाहतुकीचा आढावा घेतला... या ठिकाणी रॉंग साईट आणि वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन धारकावर दंडात्मक कारवाई सुद्धा करण्यात आली... आपल्या सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन करा, सिग्नल कोणी तोडणार नाही याची स्वत: आपण खबरदारी घ्या.. असं आवाहन त्यांनी यावेळी केलं... यावेळी वाहतूक पोलिसांना बेशिस्त वाहन धारकावर कडक कारवाईचे आदेश सीपी राकेश ओला यांनी दिले...*

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न द्या

## डॉक्टर्स असोसिएशनचा अन्नत्याग आंदोलनाला जाहीर पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२तिवसा** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मरणोत्तर देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी तिवसा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला डॉक्टर्स असोसिएशन, तिवसा तालुका, यांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

क्रांतिदिनाचे औचित्य साधून ९ ऑगस्टपासून गुरुदेव भक्त मुकुंद पुनसे यांच्या नेतृत्वाखाली हे अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा देशपातळीवर सन्मान व्हावा, यासाठी भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी करण्यात येत आहे. या मागणीला आता डॉक्टर्स असोसिएशननेही पाठिंबा दर्शविला आहे.असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेल्या पत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सामाजिक, राष्ट्रीय आणि ग्रामविकासाच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या भजनांच्या माध्यमातून देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांमध्ये देशभक्ती व लढण्याचे बळ निर्माण केले. तसेच 'ग्रामगीता' या ग्रंथाच्या माध्यमातून ग्रामविकास, स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती, सामाजिक एकोपा आणि स्वावलंबनाचा संदेश समाजाला दिला, असे पत्रात नमूद करण्यात




आले आहे.'गाव सुधारले तर देश सुधारेल' या विचारातून राष्ट्रसंतांनी ग्रामाच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग दाखविला. ग्रामोन्नतीच्या कार्यातून त्यांनी ग्रामीण समाजाला विकासाची नवी दिशा दिली. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन मरणोत्तर भारतरत्न देणे ही त्यांच्या कार्याला योग्य मानवंदना ठरेल, अशी भावना डॉक्टर्स असोसिएशनने व्यक्त केली आहे.राष्ट्रसंतांच्या कार्याची देशभरात ख्याती असून त्यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २००९ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या माध्यमातून मोझरी विकास आराखड्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, असा उल्लेखही असोसिएशनच्या पत्रात करण्यात आला आहे.या समर्थन पत्रावर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. तेजस जोशी, उपाध्यक्ष डॉ. आशिष बोथे, कोषाध्यक्ष डॉ. रोशन बोके, सचिव डॉ. निरंजन गणोरकर यांच्यासह डॉ. अंकुश देशमुख, डॉ. कृष्णकुमार खाकसे, डॉ. विजय देवळे, डॉ. संदीप अमृतकर, डॉ. राजेश वांईदेशकर, डॉ. भूषण पाटील, डॉ. राजेंद्र पालिवाल, डॉ. प्रशांत ठोसर, डॉ. महल्ले, डॉ. नायसे, डॉ. उके, डॉ. उमाकांत वणवे, डॉ. संदीप देशमुख, डॉ. गहुकर, डॉ. प्रभाकर उमप आणि डॉ. विनायक उमप यांची उपस्थिती होती.

# वन्यप्राण्यांचा हैदोस; शेतकरी त्रस्त!

## पीक नुकसान भरपाईसह उपाययोजना करण्याची शिवसेनेची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती** – अंजनगाव सुर्जी, दर्यापूर आणि भातकुली तालुक्यांमध्ये हरिण, रानडुक्कर, रोही यांसह अन्य वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. वन्यप्राणी शेतांमध्ये घुसून सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याने शेतकऱ्यांना दरवर्षी आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. पिकांचे संरक्षण करण्यासाठी अनेक शेतकरी रात्रभर शेतात पहारा देत असून त्यांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुनिल पाटील डिवे यांनी वन विभागाकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वन्यप्राण्यांचे वैज्ञानिक सर्वेक्षण करून त्यांच्या वाढत्या संख्येचे व्यवस्थापन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.दर्यापूर येथे वन विभागाचे कार्यालय असतानाही पीक नुकसानीचे अर्ज स्वीकारले जात नसून शेतकऱ्यांना परतवाडा कार्यालयात पाठविले जाते, अशी तक्रारही निवेदनात करण्यात आली आहे. त्यामुळे दर्यापूरमध्येच अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.पेरणीपासूनच होणारे नुकसान भरपाईच्या कक्षेत आणावे, गावनिहाय वन समित्या स्थापन कराव्यात, तसेच सौर कुंपण, पिंजरे, हाकल मोहीम आणि नुकसानभरपाईच्या प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास शिवसेनेतर्फे तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# विदर्भाच्या नंदनवनात दरीतून वर येतेय धुक्याची लाट!

## चिखलदऱ्याच्या सौंदर्याला पावसाची 'किनार': पर्यटकांची तुफान गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२चिखलदरा**

कुठं डोंगर दिसतोय, कुठं दरी आहे आणि कुठं आभाळ हेच कळू नये, इतकं दाट धुकं. काही क्षणातच समोरचं दृश्य पांढऱ्या धुक्याच्या पडद्याआड अदृश्य होतं आणि पुढच्या क्षणी दरीतून जणू पांढऱ्या ढगांच्या लाटा वर येताना दिसतात.

रिमझिम पाऊस, अंगाला झोंबणारा वारा आणि धुक्यानं पूर्णपणे वेढलेले डोंगर. सध्या विदर्भाचं नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्याचं रूप अक्षरशः स्वर्गीय झालं आहे. पावसाळ्यातील या निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक चिखलदाऱ्याकडं धाव घेत आहेत.

पावसाळयामुळं चिखलदऱ्याच्या डोंगरदऱ्या हिरव्यागार झाल्या आहेत. त्यातच गतकाही दिवसांपासून परिसरात दाट धुक्याची चादर पसरत असल्यानं चिखलदऱ्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे. अनेक ठिकाणी परिस्थिती अशी आहे की अगदी काही मीटर अंतरावरील वस्तू देखील धुक्यामुळे स्पष्ट दिसत नाही. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांच्या हेडलाईटचा प्रकाश धुक्यात मिसळला की एक वेगळंच




चित्रपटाच्या पडद्यावरचं दृश्य डोळ्यासमोर उभं राहतं. दिवसभर धुक्याची हीच स्थिती कायम राहत असल्यानं पर्यटकांसाठी हा निसर्गाचा अनोखा अनुभव ठरत आहे. त्यातच रिमझिम पाऊस आणि सातपुड्याच्या डोंगरातून येणारा थंडगार वारा वातावरणाला अधिकच अल्हाददायक बनवत आहे.

चिखलदऱ्यात सध्या अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येनं पर्यटक दाखल होत आहेत. शनिवारी आणि रविवारी पर्यटकांची गर्दी विशेष वाढत असली तरी आठवड्याच्या इतर दिवशीही चिखलदऱ्यात पर्यटकांची वर्दळ पाहायला मिळत आहे. पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनानं वाहतुकीचं नियोजन केलं असून धामणगाव गडी मार्गे चिखलदऱ्याला जाण्याचा आणि घटांग मार्गे परतीचा मार्ग ठेवण्यात आला आहे.

आता पावसाळा असल्यानं चिखलदऱ्याचं वातावरण अतिशय मनमोहक झालं आहे.

> **दरीतून वर येते धुक्यांची लाट :**
> चिखलदाऱ्यातील सर्वात आकर्षक दृश्य सध्या दरींमध्ये पाहायला मिळत आहे. खाली साचलेलं धुकं हळूहळू वर सरकत आणि पाहता पाहता संपूर्ण दरी पांढऱ्या ढगांनी भरल्यासारखी दिसते. खरंतर धुकं दरीतून एखाद्या वस्तूप्रमाणं वर येत आहे, वातावरणातील थंड आणि दमट हवेच्या हालचालींमुळे असा भास निर्माण होतो. पावसाळ्यात दरींमध्ये आर्द्रता मोठ्या प्रमाणात असते. रात्री आणि पहाटे डोंगराच्या उतारा वरची हवा थंड होऊन दऱ्यांमध्ये साचते. ही हवा पुरेशी थंड झाली की त्यातील जलवाष्पाचं सूक्ष्म पाण्याच्या थेंबा मध्ये रूपांतर होतं आणि धुक्यांची निर्मिती होते. नंतर तापमान, वाऱ्याची दिशा आणि हवेच्या हालचाली बदलल्या की हे धुकं दरीच्या उतारांवरून सरकत वर जाताना दिसतं. त्यामुळं पर्यटकांना दरीतून पांढऱ्या धुक्याची लाट वर येते, असा अविस्मरणीय भास होतो.

निसर्गाच्या कुशीत वसलेला विदर्भाचा स्वर्ग चिखलदरा हे केवळ थंड हवेचं ठिकाण नाही, तर विदर्भाच्या पर्यटन विश्वातील एक महत्त्वाचं आकर्षण आहे. पावसाळयात मात्र चिखलदऱ्याला निसर्ग वेगळंच रूप देतो.

हिरवाईनं नटलेले डोंगर, खोल दरी, धबधबे, रिमझिम पाऊस, गार वारा आणि त्यावर पसरलेली धुक्याची पांढरी चादर या सगळ्यांचा संगम सध्या चिखलदऱ्यात अनुभवायला मिळतो. सातपुड्याच्या कुशीत पर्यटनाची मजा घेण्यासाठी येणारे पर्यटक सध्या धुक्यात स्वतःला हरवून घेण्यात रमले आहेत.

# वडाळीत पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२अमरावती :** वडाळी परिसरातील गुरुकृपा कॉलनी येथे पोलीस हेडकॉन्स्टेबल अमित खंडारे यांनी



आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.अमित खंडारे हे सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात हेडकॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. १९ जून रोजी त्यांची वाहतूक शाखेतून सिटी कोतवाली येथे बदली झाली होती. त्यानंतर २२ जून रोजी पोलीस मुख्यालयात रिफ्रेश कोर्ससाठी त्यांना रवाना करण्यात आले होते.खंडारे हे गुरुकृपा कॉलनीतील घराच्या पहिल्या मजल्यावर पत्नी आणि दोन मुलांसह राहत होते. त्यांची पत्नी शिक्षिका असून, आज सकाळी साडेसातच्या सुमारास त्या मुलांसह शाळेसाठी घराबाहेर पडल्या. पत्नी व मुले घराबाहेर गेल्यानंतर अमित खंडारे यांनी आत्मघाती पाऊल उचलल्याचे समोर आले.घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आत्महत्येचे नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पोलिस दलातही खळबळ उडाली आहे.

# नो-एंट्रीतील ट्रकने घेतलेल्या दोन महिलांच्या बळीप्रकरणी कठोर कारवाई करा

## मृतकांच्या परिवाराला ५० लक्ष रु देण्याची ही मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती :**

राजापेठ उड्डाणपुलावर २८ जुलै २०२६ रोजी नो-एंट्रीत धावणाऱ्या ट्रकने दोन निष्पाप महिलांचा बळी घेतल्यानंतर अमरावती शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या भीषण अपघातात बोरगाव धर्माळे येथील २६ वर्षीय कु. गायत्री प्रमोदराव धर्माळे आणि भटवाडी येथील ३९ वर्षीय सौ. हर्षा आदेशराव गावंडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, आतापर्यंत करण्यात आलेल्या चौकशीची माहिती संबंधित कुटुंबीयांना लेखी स्वरूपात देण्याची मागणी आज मृतकांच्यानातेवाईकांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या



निवेदनातून करण्यात आली.तरमृतकांच्या परिवाराला ५० लक्ष रु देण्याची ही मागणी या वेळी करण्यात आली.अपघातग्रस्त ट्रकचे पासिंग झालेले नव्हते, वाहनावर नंबर प्लेट नव्हती तसेच चालकाकडे वैध परवाना होता की नाही, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत नियमबाह्य वाहन शहरातील प्रमुख रस्त्यांवर कसे फिरत होते, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे, अपघातातील दोन्ही महिलांनी हेल्मेटसह वाहतुकीचे नियम पाळले होते. नागरिक नियमांचे पालन करत असताना विना-पासिंग, विना-नंबर आणि अनधिकृत जड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यात आरटीओ व पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करण्यात ही यावेळी करण्यात आला आहे.दरम्यान, शहरातील वेलकम पॉईंट परिसरात मुख्य रस्त्यावर उभ्या केल्या जाणाऱ्या खासगी बसेसचा प्रश्नही गंभीर आहे. याबाबत वारंवार निवेदने देऊनही कारवाई होत नसल्याने दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढत आहे.याशिवाय शहरात रस्त्याच्या कडेला अवघ्या २०० रुपयांत निकृष्ट दर्जाची हेल्मेट विक्री होत असल्याचा आरोप आहे. केवळ पोलिसांच्या दंडापासून बचावासाठी नागरिक ही हेल्मेट खरेदी करतात; मात्र अपघाताच्या वेळी ती सुरक्षितता देण्याऐवजी फुटून जाण्याची शक्यता असते. त्यामुळे सुरक्षा मानक नसलेल्या बनावट हेल्मेटची विक्री तातडीने थांबवून विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.शहरातील जड वाहतुकीवर प्रभावी बंदी, अवैध वाहनांवर कारवाई, खासगी बस पार्किंगला आळा आणि निकृष्ट हेल्मेट विक्रीवर नियंत्रण आणण्यासोबतच प्रशासकीय भ्रष्टाचार व अंमलबजावणीतील त्रुटींवर थेट कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चार सदस्यांच्या अपात्रतेला हायकोर्टाची अंतरिम स्थगिती

## जामगाव खडका ग्रामपंचायतमधील प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२वरुड –** जामगाव खडका ग्रामपंचायतच्या चार सदस्यांना अपात्र ठरविणाऱ्या विभागीय आयुक्तांच्या आदेशाला नागपूर उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे चारही सदस्यांना तूर्तास मोठा दिलासा मिळाला असून ते ग्रामपंचायतच्या कामकाजात सहभागी होऊ शकणार आहेत. विभागीय आयुक्तांनी चारही सदस्यांना अपात्र ठरविल्यानंतर संबंधित सदस्यांनी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याप्रकरणात ॲड. धनंजय तोटे यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. सुनावणीनंतर न्यायालयाने विभागीय आयुक्तांच्या अपात्रतेच्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली. उच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे चारही सदस्यांना सध्या ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जामगाव खडका ग्रामपंचायतीतील राजकीय घडामोडींना नवे वळण मिळाले असून सत्तासमीकरणांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चार सदस्यांच्या अपात्रतेनंतर ग्रामपंचायतीतील सत्तासंतुलन बदलण्याची चर्चा सुरू होती. मात्र, उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशामुळे त्या प्रक्रियेला तूर्तास स्थगिती मिळाली आहे. दरम्यान, हा केवळ अंतरिम आदेश असून प्रकरणाची पुढील सुनावणी न्यायालयात होणार आहे. त्यामुळे अंतिम निकालाकडे ग्रामस्थांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व
राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :